# <u>आरती श्री स्वामी समर्थांची</u>

आरती सद्गुरू स्वामींची
अवधूत स्वामी समर्थांची ॥धृ.॥

यती तो तेजाचा पुतळा
लावी लहान थोरां लळा
अवतरे भक्त प्रतिपाळा
अगाध असे किमया त्याची
अवधूत स्वामी समर्थांची ॥१॥

अक्कलकोटी जरी निवास
भक्तहृदयी परी करी वास
भीतीचा पूर्ण होई ऱ्हास
पडता कृपादृष्टी त्याची
अवधूत स्वामी समर्थांची ॥२॥

जरी अवतार दत्तगुरूचा
घरी कधी वेष अंबाईचा
करी उद्धार लेकरांचा
वाट दाखवूनी मोक्षाची
अवधूत स्वामी समर्थांची ॥१॥

- नारायण
१२/१७/९५
(अमेरिका)

ॐ
औदुंबरवासी दत्तराज महाराज की जय !
अनंत कोटी ब्रह्मांड नायक राजाधिराज -
श्री सद्गुरू देव दत्त दत्त दत्त !
श्री स्वामी समर्थ महाराज की जय !

ॐ

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधिसाक्षीभूतं
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरू तं नमामि ॥

ॐ

ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे
त्या त्या स्थळी हे निजरूप तुझे ।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी
तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही ॥

जय जय रघुवीर समर्थ ।